सत्य नेहमीच शक्तिशाली असते

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार २१ मे २०२५ | अंक १५९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




## तात्पुरतं नादी लावलंय, भुजबळांनी मंत्रिपदाची शपथ घेताच जरांगे पाटील यांचा अजितदादांवर निशाणा

राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांना मंत्रिपदावरून पायउतार व्हावे लागल्यानंतर आता त्याच खात्याची जबाबदारी राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांच्यावर सोपवण्यात आली आहे. त्यासाठी आज सकाळी भुजबळ यांचा शपथविधी सोहळा पार पडला. विधानसभा निवडणुकीनंतर त्यांना मंत्रिपद देण्यात आलं नव्हतं. मात्र आता त्यांच्यावर मंत्रिपदाची जबाबदारी पुन्हा सोपवण्यात आली आहे. असे असतानाच आता मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. भुजबळ यांना मंत्रिपद देऊन उपमुख्यंत्री अजित पवार चूक करत आहेत, असं मत त्यांनी व्यक्त केलंय. त्यांच्या याच मताचा समाचार भुजबळ यांनी घेतलाय.मनोज जरांगे यांनी चुका नव्हे तर खेळ केलामंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर भुजबळ यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी त्यांना जरांगे यांच्या प्रतिक्रियेवर विचारण्यात आलं. यावर बोलताना त्यांनी जरांगे यांच्यावर कठोर शब्दांत टीका केली. जरांगे यांच्यामुळे खुद्द मराठा समाजालाही त्रास झाला आहे. मनोज जरांगे यांनी चुका नव्हे तर खेळ केलेला आहे. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील मराठा समाजाचे प्रचंड नुकसान केलेले आहे, अशी कठोर शब्दांत भुजबळ यांनी टीका केली. तसेच आम्ही मराठा समाजाला बंधू म्हणून मानतच आलेलो आहोत. सगळ्या ठिकाणींनी आमचा तसाच वावर आहे. पण जरांगे यांच्या कर्तृत्त्वामुळे मराठा समाजालाही त्रास झालाय, असा पलटावर भुजबळ यांनी केला. भुजबळांना मंत्रिपद दिल्यामुळे मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र



फडणवीस यांच्यावर टीका केली. ते म्हणाले की, छगन भुजबळला मंत्रीपद देणे हा देवेंद्र फडणवीस यांचा डाव असू शकतो. मराठा संपवण्याचा विडा देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. देवेंद्र फडणवीस यांना एकनाथ शिंदे यांनी प्रवाहात आणले. परंतु आता एकनाथ शिंदे यांना फडणवीस यांनी बाहेर टाकले आहे.

### मनोज जरांगे नेमकं काय म्हणाले?

छगन भुजबळ यांनी शपथ घेतली काय किंवा नाही काय, तो त्यांच्या पक्षाचा अंतर्गत प्रश्न आहे. भुजबळ आधीही मंत्री होते. आताही ते मंत्री झाले आहेत. आम्हाला त्याचा काही फरक पडत नाही. जातीयवादी लोक पोसायचे आणि राज्यात जातीय तणाव निर्माण करायचा? हे अजित पवार यांना का समजत नाही. अजित पवार प्रत्येक वेळी मोठी चूक करत आहेत. जिल्हा परिषदांच्या निवडणुकांपर्यंत त्यांना मंत्रिपद दिलं असेल. त्यांच्या आनंदावर भविष्यात शंभर टक्के विरजन पडेल, असं मला वाटतंय, असं मनोज जरांगे म्हणाले.

### सर्व आमदारांकडून विरोध हवा होता

अजित पवार यांच्यावर टीका करताना मनोज जरांगे म्हणाले, अजित पवार हे जातीयवादी लोकांना पोसण्याचे काम करत आहेत. त्याची किंमत त्यांना मोजावी लागणार आहे. आता जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका आल्यामुळे छगन भुजबळ यांना तात्पुरता आनंद दिला असणार आहे. छगन भुजबळ यांना चॉकलेट दिले असणार आहे. परंतु लवकरच छगन भुजबळ यांच्या आनंदावर विरजण पडणार आहे. छगन भुजबळ जातीयवादी आहेत. त्यांना मंत्रिपद देऊ नका, असा विरोध अजित पवार यांच्या पक्षातील सगळ्या आमदारांनी करायला पाहिजे होता, अशी अपेक्षा मनोज जरांगे यांनी व्यक्त केली.

## जनतेला ३५ लाख घरांची लॉटरी; नवीन गृहनिर्माण धोरणाला मंत्रिमंडळाची मंजूरी, दोन नवीन धरणं नवी मुंबईची तहान भागवणार

राज्यातील जनतेला घरांची लॉटरी लागणार आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्याच्या नवीन गृहनिर्माण धोरणाला मंजूरी देण्यात आली आहे. 'माझे घर-माझे अधिकार' या संकल्पना प्रत्यक्षात राबवण्यात येणार आहे. त्यासाठी 70 हजार कोटींची गुंतवणूक करण्यात येत आहे. त्यानुसार, येत्या 5 वर्षांत 35 लाख घरे उभारण्यात येणार आहेत. EWS, LIG आणि MIG घटकांना घरं देण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याविषयीची माहिती दिली.महाविकास पोर्टलद्वारे घराचे स्वप्न अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि नैसर्गिक घटकांशी साधर्म्य घालून शाश्वत घर उभारण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. 2007 नंतर पहिल्यांदाच असे धोरण राबवण्यात येत आहे. महाविकास पोर्टलच्या माध्यमातून सर्व लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ति होणार आहे. सरकारची जागा मॅपिंगद्वारे गृहनिर्माण प्रकल्पासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यामुळे घराचे स्वप्न सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाणार नाही. मुंबईसह नवी मुंबईचा पाण्याचा प्रश्न सुटणार तर दुसरीकडे मुंबई महानगर प्रदेशातील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत पोशीर आणि शिलार या नव्या धरणांना मंजुरी देण्यात आली आहे. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी ही माहिती दिली आहे. एम एम आर भागातील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी राज्य सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मुंबई, नवी मुंबई सह एम एम आर भागातील पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. त्यासाठी 12 हजार कोटी खर्च येणार आहे. त्या त्या पालिका याचा खर्च करणार आहेत. राज्य सरकार देखील खर्च करणार आहे. तर अरुणा ( सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ) हा प्रकल्प याला देखील मान्यता मिळाली आहे. महिन्या भरात टेंडर काढले जाईल. एम एम आर भागातील पाणी टंचाई सुटणार आहे. साडे 18 टी एम सी पाणी दोन धरणातून मिळणार आहे. काळू आणि शाई धरण प्रलंबित आहेत ती देखील करण्यात येतील. खारे पाणी गोड करण्याची प्रक्रिया प्रोजेक्टवर देखील काम सुरु आहे. मुख्यमंत्री यांनी या प्रकल्प जलद गतीने करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. लवकर या बाबत टेंडर निघेल. 1000 एम एल डी पाणी गोड करण्या चे टेंडर निघत आहे, अशी माहिती महाजन यांनी दिली. आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णय 1) कारंजा, जिल्हा वाशिम येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करण्याचा निर्णय. यासाठी एकूण 28 पदनिर्मितीला तसेच 1.76 कोटींच्या खर्चाला मंजुरी (विधी व न्याय विभाग) 2) बायोमिथेनेशन तंत्रज्ञानाचा वापर करुन कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी मे. महानगर गॅस लिमिटेड यांना बृहन्मुंबई महापालिकेच्या अखत्यारीतील देवनार येथील भूखंड सवलतीच्या दरात भाडेपट्ट्याने उपलब्ध करुन देणार (नगरविकास विभाग) 3) उद्योग विभागाच्या अंतर्गत धोरण कालावधी संपुष्टात आलेल्या धोरणांतर्गत विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांना मंजुरी (उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग) 4) राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर 'माझे घर-माझे अधिकार' हे ब्रीद. 70 हजार कोटींची गुंतवणूक येणार, झोपडपट्टी पुनर्वसन ते पुनर्विकास असा सर्वांगीण कार्यक्रम (गृहनिर्माण विभाग) 5) सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजना, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे या प्रकल्पाच्या 5329.46 कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता. 52,720 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार (जलसंपदा विभाग) 6) अरुणा मध्यम प्रकल्पांतर्गत मौजे हेत, तालुका वैभववाडी जिल्हा सिंधुदुर्ग या प्रकल्पासाठी 2025.64 कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता. 5310 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार (जलसंपदा विभाग) 7) पोशिर प्रकल्प, तालुका कर्जत जिल्हा रायगड या प्रकल्पाला 6394.13 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा विभाग) 8) शिलार तालुका कर्जत जिल्हा रायगड या प्रकल्पाला 4869.72 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा विभाग)

## मराठवाडा विभागीय टेबल टेनिस स्पर्धेत बीडच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी.



परभणी | १७ मे २०२५ मराठवाडा विभागीय यूथ कंटेंडर टेबल टेनिस स्पर्धा नुकतीच १७ मे रोजी परभणी येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत बीड, परभणी, नांदेड, छत्रपती संभाजीनगर येथील १०० हून अधिक खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवून दमदार खेळाचे प्रदर्शन केले. बीडच्या डायनॅमिक टेबल टेनिस अकॅडमीच्या खेळाडूंनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घेत उल्लेखनीय यश मिळवले. विविध गटांमध्ये त्यांनी विजयश्री खेचून आणत बीड जिल्ह्याचे नाव उज्वल केले. खास करून पुढील खेळाडूंनी खालीलप्रमाणे यश संपादन केले: शौर्य शिनगारे अंडर १७ मुले विजेता अंडर १५ मुले द्वितीय अंडर १३ मुले तृतीय आलम सिद्दिकी अंडर ११ मुले विजेता अंडर १३ मुले उपविजेता अंडर १५ मुले उपविजेता गाथा डोरले अंडर ११ मुली तृतीय क्रमांक इनाया शेख अंडर १३ मुली तृतीय क्रमांक (पारितोषिक) या स्पर्धेमधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल डायनॅमिक टेबल टेनिस अकॅडमीचे प्रशिक्षक श्रीकांत व्यवहारे सर व त्यांच्या शिस्तशीर मार्गदर्शनाचे सर्वत्र कौतुक होत आहे. खेळाडूंनी दाखवलेली गुणवत्ता, मेहनत आणि समर्पण हे भविष्यातील राष्ट्रीय स्तरावरील यशाचे संकेत आहेत, असे मत क्रीडा क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केले आहे.

## जळगावातील शिवसेना कार्यालयात भूत असल्याची अफवा

जळगावातील नवीन शिवसेना कार्यालय उद्घाटनापूर्वी चर्चेत आले आहे. या कार्यालयात भूत असल्याच्या अफवांनी जिल्ह्यात चांगलाच जोर धरला आहे. त्या अफवांची दखल मंत्री गुलाबराव पाटील यांनी घेतली. त्यांनी आपल्या भाषणात याबद्दल उल्लेख केला. कार्यकर्त्यांची समजूत काढली. तसेच आपणही रोज या कार्यालयात एक तास बसणार असल्याचे सांगितले.

जळगावातील सिंधी कॉलनीत शिवसेना कार्यालय उभारण्यात आले आहे. परंतु या जागेत दोष असून भूत असल्याची अफवा पसरली आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी या कार्यालयाकडे पाठ फिरवल्याची चर्चा आहे. याबद्दल मंत्री गुलाबराव पाटील यांनी स्वत: माहिती दिल्यानंतर हे कार्यालय चांगलेच चर्चेत आले आहे. एका मेळाव्यात मंत्री गुलाबराव पाटील यांनी भाषणात नव्या कार्यालयातील भूत असल्याच्या अफवेबद्दल कार्यकर्त्यांची समजूत काढली. शिवसेनेत फूट पडल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे स्वतंत्र कार्यालय नव्हते. त्यामुळे सिंधी कॉलनी भागात शिवसेनेचे कार्यालय तयार करण्याचे काम मंत्री गुलाबराव पाटील यांनी सुरु केले.

## शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या कार्यपद्धतीवर प्रभावित होऊन असंख्य तरुणांचा शिवसेनेत प्रवेश

बीड : (प्रतिनिधी) शिवसेना जिह्लाप्रमुख पदाची जबाबदारी स्वीकारून आज उह्लास गिराम यांच्या पक्ष कार्यास दोन महिने पुर्ण होत आहेत. त्यांची विचारसरणी, सामान्य लोकांच्या गरजाशी निगडित आंदोलने याला प्रभावित होऊन बीड शहरातील बार्शीनाका परिसरातील असंख्य तरुणांनी उह्लास गिराम यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.शिवसेना पक्षफुटी नंतर बीड जिल्यातील शिवसैनिक बॅकफुट आला



होता. जिह्लाप्रमुख म्हणून उह्लास गिराम यांनी जबाबदारीचे भान ठेऊन जुन्या-नव्या शिवसैनिकांची मोट बांधून सामान्य शिवसैनिकांत उत्साह निर्माण केला. सामान्य जनता ज्या छोट छोटया समस्यानी ग्रासली आहे, हे हेरून आंदोलने उभारली.उह्लास गिराम यांच्या याच कार्यपद्धतीला प्रभावित होऊन आज शेकडो तरुण पक्ष प्रवेशा संदर्भात विचारणा करत आहेत. याचाच एक भाग म्हणजे आज बीड शहरातील बार्शीनका परिसरातील युवक मछिंद्र काळे, दिपक अंकुशे, परशुराम काळे, कृष्णा काळे, अनिल अंकुशे, सोनु रोकडे, दुसरा दीपक अंकुशे, करण अंकुशे, गोरख अंकुशे, पप्पु लोंढे, गणेश रोकडे, लखन काळे, अमोल लोंढे, मछिंद्र अंकुशे सह असंख्य युवकांनी प्रवेश केला.

यावेळी शिवसेना उपजिह्लाप्रमुख राजाभाऊ माहुवाले, सुशील पिंगळे, सतिशसिह परदेशीं, दिलीप पवार, रंगनाथ पैठणकर, विशाल तांबे सह शिवसैनिकांची उपस्थिती होती.

## असा काय नाईलाज, सभ्य माणसं नाहीत का राजकारणात? छगन भुजबळ यांच्या शपथविधीपूर्वीच अंजली दमानिया यांची ती पोस्ट व्हायरल

ओबीसी चळवळीचा चेहरा आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेत छगन भुजबळ आज सकाळी 10 वाजता राजभवनात मंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्यानंतर त्याच्या रिक्त खात्याचा कारभार भुजबळांच्या खाद्यांवर येईल. सत्तेत आल्यावर भुजबळांना मंत्रीमंडळात स्थान मिळाले नव्हते. त्यामुळे ते नाराज होते. आता ही नाराजी दूर होत आहे. तर नाशिकमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढणार आहे. दरम्यान सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी त्यांच्याविरोधात पुन्हा एकदा तोफ डागली आहे. त्यांनी सोशल मीडिया एक्सवर पोस्ट करून मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. त्यामुळे दमानिया यांनी भुजबळाविरोधात पुन्हा एकदा शड्डू ठोकल्याचे दिसून येते. छगन भुजबळ यींनी एक आठवड्यापूर्वीच मंत्री पदाबाबत ठरल्याची माहिती त्यांनी दिली. भुजबळ यांची मंत्रिमंडळात वर्णी लागल्याने नाशिकसह येवल्यात त्यांच्या समर्थकांनी जल्लोष केला आहे. तर दुसरीकडे आता त्यांच्याविरोधात अंजली दमानिया समोर आल्या आहेत. त्यांनी सोशल मीडिया एक्सवर पोस्ट लिहिली आहे. त्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना खडा सवाल केला आहे. असा काय नाईलाज? दमानिया यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. त्यात वाह फडणवीस वाह ! म्हणजे एका भ्रष्ट मंत्र्याच्या जागी दुसरा भ्रष्ट मंत्री येणार? जनता अशीच भरडली जाणार? की हा माझ्यासारख्या भ्रष्टाचार विरोधी लढणाऱ्यांना संदेश आहे, की तुम्ही आमच काहीच वाकड करू शकत नाही? असा काय नाईलाज आहे ? की सभ्य माणसं मिळत नाहीत राजकारणात? अशी प्रश्नांची सरबत्ती करत त्यांनी मोठा धुराळा उडवून दिला. आणि हो, हेच भुजबळ जेव्हा जेल मधे होते, तेव्हा एक अगदी बिचाऱ्या सारखा फोटो माध्यमांमध्ये दाखवला जायचा. तेव्हा छातीत कळ यायची. मग आता ठणठणीत ? असा खोचक सवाल दमानिया यांनी केला. किळस वाटतेय महाराष्ट्राच्या राजकारणाची कालच्या घोषणा आठवतात ? "भ्रष्टाचारीयो पर कारवाई के लिए, अब की बार ४०० पार", "भ्रष्टाचार के खिलाफ मोदी सरकार के बडे कदम" हा आहे का तो बडा कदम ? ही ती कारवाई ?, असा खडा सवाल दमानिया यांनी भाजपाला विचारला आहे. भ्रष्ट मंत्री थोपावला छगन भुजबळ मंत्री म्हणून शपथ घेत आहेत हे मला कळालं तेव्हा असच अस्वस्त वाटलं. राग आला, अशी प्रतिक्रिया आज सकाळी अंजली दमानिया यांनी माध्यमांना दिली. असं कसं एक भ्रष्ट मंत्री गेला तर त्याच्या जागेवर दुसरा भ्रष्ट मंत्री आपल्या डोक्यावरती थोपवला जात आहे.भुजबळ विरोधात सुप्रीम कोर्टापर्यंत आम्ही लढलो. त्यांच्यावरती



सात घोटाळे आहे. त्यामध्ये महाराष्ट्र सदन घोटाळा, कलिना लायब्ररी सह 53 कोटीचे देखील घोटाळे आहेत. इतके घोटाळे असून तरी तुम्हाला त्याच माणसाला मंत्री म्हणून घ्यायचाय तुम्हाला चांगली माणसं मिळत नाही का राजकारणात, असा सवाल त्यांनी विचारला. एकीकडे धनंजय मुंडे यांच्या विरोधात लढून त्यांचा राजीनामा घेतोय तर दुसरीकडे जे अडीच वर्ष जेलची वारी करून आलेत छगन भुजबळ आमच्या डोक्यावरती थोपवत आहात, अशी संतप्त प्रतिक्रिया त्यांनी दिली. पुरावे देऊन काय झालं? सिंचन घोटाळा वेळेवर अनेक पुरावे देवेंद्र फडणीस यांना दिले. त्याच घोटाळ्यात असलेल्या अजित पवार आणि तटकरे यांना देवेंद्र फडणीस हे बरोबर घेत आहे. महाराष्ट्र सदन घोटाळा यामध्ये जीव ओतून काम करत एफआयआर करून भुजबळांना जेलवारी झाली. त्यांना अडीच वर्षे तुरुंगवास भोगावा लागला. छगन भुजबळ, अशोक चव्हाण यांना मंत्रीपद देत असेल तर अशांना काय म्हणावं आणि राजकारण इतकं किळसवानं का? चांगल्या माणसाला राजकारणात का घेत नाही असा प्रश्न मलाही नाना पाटेकर आणि सर्वांना पडत आहे. यांना मंत्रीपद देत असेल तर असं वाटतं की तुम्ही किती लढा आम्हाला काय फरक पडत नाही आम्हाला जे हवे त्यान्हा आम्ही घेणार असं राजकारण सुरू आहे का, असा सवाल त्यांनी केला. हा तमाशा बघवत नाही भाजप सरकारने भ्रष्टाचार नको असे वेगवेगळे बॅनर बनवले. मोदींनीही सांगितलं होतं 2014 आणि 2024 मध्ये भ्रष्टाचार वरती कारवाई करणार मग आता हे बॅनर आणि यांचे हे विचार गेले कुठे असा सवाल त्यांनी केला. माझ्या एका फोटोमध्ये सगळे गाजलेले भ्रष्टाचारी आहेत त्यात नारायण राणे ,प्रफुल पटेल या सर्वांच्या मध्ये देवेंद्र फडणीस बसलेले दिसले त्यामुळे या लोकशाहीला काय म्हणावं, असा सवाल त्यांनी केला. लोकशाहीचा चाललेला तमाशा हा बघवत नाही. एकीकडे दहशतवाद विरोधात ऑपरेशन सिंदूर करतात मग भ्रष्टाचाराच्या या दहशतवादाला आपण काय म्हणणार, हे भ्रष्टाचारी दहशतवादीच आहे, हे बंद झाले पाहिजे म्हणून आम्ही लढत आहोत. मात्र आता हे सगळं थांबवाय सारखं वाटतं असल्याची प्रतिक्रिया दमानिया यांनी दिली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

बुधवार २१ मे २०२५

https://lokaarambh.com




## संपादकीय

## शिष्टमंडळे पाठविण्याची संकल्पना स्वागतार्ह

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचे कारस्थान घडवून आणणाऱ्यांना लक्ष्य करण्यासाठी राबविण्यात आलेली ‌ऑपरेशन सिंदूरफ ही मोहीम आणि त्यानंतर पाकिस्तानने केलेल्या हल्ल्यांना भारताने दिलेले प्रत्युत्तर यांबाबत जगभरात विविध देशांना माहिती देण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळे पाठविण्याची संकल्पना स्वागतार्ह आहे. पक्षीय मतभेद विसरून जगासमोर देशाची ठाम भूमिका मांडण्यासाठीचे हे पाऊल उचलून मोदी सरकारने ‌वयं पंचाधिकं शतमम असल्याचे दाखवून दिले आहे. काँग्रेसचे खासदार शशी थरूर हे यांपैकी एका शिष्टमंडळाचे नेतृत्व करणार असून, त्यांची निवड ही या राजकारणाच्या मुळाशी आहे. या शिष्टमंडळांत आपल्या पक्षाचे कोण असावेत, यासाठीची विचारणा सरकारकडून काँग्रेससह अन्य पक्षांना झाली. त्यानंतर काँग्रेसने चौघांची नावे दिली; परंतु त्यात थरूर यांचे नाव नव्हते. असे असताना शिष्टमंडळात थरूर कसे, असा प्रश्न काँग्रेसकडून विचारला जात आहे. संयुक्त राष्ट्रांतील कामाचा थेट अनुभव, आंतरराष्ट्रीय राजकारणाचे ज्ञान; तसेच राजनैतिक चौकटीतील मांडणी या निकषांवर थरूर यांचा शिष्टमंडळातील समावेश रास्त ठरतो; परंतु अंतर्गत राजकारणामुळे काँग्रेसने त्यांना डावलल्याचे दिसते. केरळमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीचा संदर्भही याला आहे. गेल्या काही महिन्यांपासून थरूर मोदी सरकारची भलामण करताना दिसत आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर मोदी सरकारने घेतलेल्या सर्व निर्णयांचे त्यांनी स्वागत केले होते; तसेच ‌ऑपरेशन सिंदूरफ नंतर त्यांनी आंतरराष्ट्रीय माध्यमांत भारताची बाजू भक्कमपणे मांडली होती. काँग्रेसने डावलण्यामागे ही कारणेही असू शकतात. थरूर यांची निवड करून सरकारने एक प्रकारे काँग्रेसवर कुरघोडी केली आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताची बाजू मांडण्याचा विषय ओळखून काँग्रेसनेही थरूर यांना संधी दिली असती, तर अधिक चांगले झाले असते. या राजकारणामुळे सर्वपक्षीय शिष्टमंडळाची सुरुवात अडखळत झाली आहे. शिष्टमंडळांत आणखी कोण सदस्य असावेत, जम्मू-काश्मीरचे प्रतिनिधी किती असावेत, यांबाबतही वादविवाद होत आहेत. खरे तर प्रदीर्घ काळानंतर भारत अशा प्रकारची शिष्टमंडळे विविध देशांत पाठवीत आहे. एकूण सात शिष्टमंडळे पाठविली जाणार असून, थरूर यांच्याखेरीज रविशंकर प्रसाद, बैजयंत पांडा (भाजप), संजयकुमार झा (संयुक्त जनता दल), कनिमोळी करुणानिधी (द्रमुक), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी काँग्रेस - शरद पवार) आणि श्रीकांत शिंदे (शिवसेना शिंदे) हे देखील शिष्टमंडळांचे नेतृत्व करणार आहेत. पहलगाम हल्ल्यांनंतर पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हल्ले करून भारताने चोख प्रत्युत्तर दिले; त्यानंतर पाकिस्तानने शस्त्रसंधीसाठी पुढाकार घेतला. मात्र, त्यानंतरचा शस्त्रसंधी, आपण भूमिका बजावून अणुयुद्ध रोखल्याचा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा आणि या युद्धात आपलाच विजय झाल्याची पाकिस्तानची दर्पोक्ती यांमुळे भारताचे यश झाकोळून गेले आहे. प्रचारयुद्धात पाकिस्तानने आघाडी घेतल्याचे चित्र आहे. अशा स्थितीत भारताची भूमिका आणि कामगिरी प्रभावीपणे जगासमोर मांडण्याचे आव्हान या नेत्यांसमोर असेल. जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० हटविल्यानंतरची परिस्थिती, तेथे वाढत गेलेले पर्यटन, रेल्वेसह होत असलेला पायाभूत विकास आणि दहशतवाद्यांकरवी पाकिस्तानने छेडलेले छुपे युद्ध यांबाबत जगाला तपशीलवार माहिती देण्याचे काम या शिष्टमंडळांना प्रभावीपणे करावे लागेल. ‌ऑपरेशन सिंदूरफ्नंतर भारताने जी पावले उचलली, तशीच पावले पाकिस्तानही उचलत आला आहे. भारताच्या मोहिमेची माहिती देण्यासाठी परराष्ट्र सचिवांसह सुरक्षा दलांच्या प्रतिनिधींची संयुक्त पत्रकार परिषद असो की पंतप्रधानांनी थेट हवाई तळावर जाऊन संबोधित करणे असो; पाकिस्तानने एक प्रकारे या सर्वांची भ्रष्ट नक्कल केली आहे. आता भारताने सर्वपक्षीय शिष्टमंडळ पाठविण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर पाकिस्तानही अशाच प्रकारची शिष्टमंडळे पाठविण्याचे ठरविले आहे. भारताशी बरोबरी करण्याच्या ईर्षेने पछाडलेल्या पाकिस्तानची ही कृती आश्चर्यकारक मुळीच नाही. गेल्या काही वर्षांत देशांतर्गत यादवीने ग्रस्त असलेल्या आणि आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या पाकिस्तानला भारताशी बरोबरी करण्याची संधी कोणत्याही क्षेत्रात मिळालेली नव्हती. त्याला एकटे पाडण्याचे भारताचे धोरण यशस्वीही ठरले होते. पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला घडवून काश्मीरचा मुद्दा ऐरणीवर आणून पाकिस्तानने संधी निर्माण केली आह

## स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज जयंती विविध सामाजिक उपक्रमाने साजरी होणार

## रा.काँ.पार्टी श.प.पक्षाच्या वतीने रविवारी रक्तदान शिबिर,मोफत आरोग्य तपासणी,विद्यार्थी, गुणवंत, यशवंतांचा गुणगौरव तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज

परळी (वार्ताहर) बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या हस्ते स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने रविवार 25 मे 2025 रोजी सकाळी 10 .00 वाजता श्रद्धा मंगल कार्यालय पावर हाऊस समोर परळी वै. येथे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी दिली आहे .या कार्यक्रमांमध्ये नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, भव्य रक्तदान शिबिर, गुणवंत विद्यार्थी व यशवंतांचा गुणगौरव सोहळा पार पडणार आहे .या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे असणार आहेत. तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रदेश उपाध्यक्ष डॉ नरेंद्र काळे असणार आहेत. या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणून युवक प्रदेशाध्यक्ष महबूब भाई शेख, बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, प्रदेश प्रवक्ता श्रीराम मुंडे असणार आहेत. तर या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती मध्ये महिला आघाडी जिल्हाध्यक्षा संजीवनी ताई देशमुख, ज्येष्ठ नेते फुलचंद भाऊ कराड ,युवक नेते राजेभाऊ फड, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब देशमुख, विधानसभा अध्यक्ष किरण काका पवार, नेते राजसाहेब देशमुख ,ज्येष्ठ नेते प्रभाकर वाघमोडे, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अमर देशमुख, वडवणी तालुकाध्यक्ष सुरेश भोरे, किल्ले धारूर तालुकाध्यक्ष युवराज लगड ,परळी शहराध्यक्ष ॅड जीवनराव देशमुख ,कामगार शहर जिल्हाध्यक्ष सोमनाथराव भोसले असणार आहेत. दहावी



बारावी पास झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा होत आहे .तसेच खास करून परळीच्या वैभवात भर पाडणारे हालाखीच्या परिस्थितीमध्ये काबाडकष्ट करून शासकीय नोकरीत रुजू झालेले यशवंत यांचा विशेष सन्मान होणार आहे. तसेच खाजगी मध्ये पूर्ण आरोग्य तपासणीसाठी 7000 ते 8000 हजार रुपये खर्च येतो अनेकांना हा खर्च न परवडणारा आहे एक सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे आहे. तसेच रक्तदान हे श्रेष्ठदान आहे या युक्तीप्रमाणे रक्ताचा तुटवडा पाहता सध्या रक्तदानाची खूप आवश्यकता भासत आहे यामुळे खास करून तरुणांनी या रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होऊन रक्तदान श्रेष्ठ दान या युक्ती प्रमाणे हे श्रेष्ठ दान करावे असे आव्हान करण्यात येत आहे .तसेच या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन तालुकाध्यक्ष तथा या कार्यक्रमाचे आयोजक देवराव लुगडे महाराज तसेच कार्यक्रमाचे विनीत युवक शहराध्यक्ष सय्यद फिरोज जब्बार व महिला आघाडी शहराध्यक्ष ॲड कल्पनाताई देशमुख यांनी केले आहे.

## महाराष्ट्र ही देशाची स्टार्टअप राजधानी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## स्टार्टअप कॉन्क्लेव २०२५ चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

मुंबई, दि. 20 : गुंतवणूक आणि स्टार्टअप्स संख्येच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. राज्य सरकारने स्टार्ट अप इको सिस्टिम उभी करण्यासाठी 120 कोटी रुपयांचा “फंड ऑफ फंड्स” तयार केला आहे, ज्याद्वारे स्केलेबल आणि मार्केटेबल स्टार्टअप्सना आर्थिक मदत दिली जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात सांगितले. सीएसआयआर आणि तीन प्रमुख वैज्ञानिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्टार्टअप कॉन्क्लेव 2025 चे उद्घाटन मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते आज गोरेगाव_मुंबई येथील नेस्को सेंटर येथे करण्यात आले. यावेळी केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच पृथ्वी विज्ञान राज्यमंत्री डॉ.जितेंद्र सिंग, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा, एनआयओचे संचालक प्रा.सुनील कुमार सिंह एनसीएलचे संचालक डॉ.आशीष लेले, नीरीचे संचालक आणि डॉ.एस. वेंकट मोहन, स्टार्टअप, उद्योजक, विद्यार्थी आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्राला 701 किमीचा समुद्रकिनारा असून येथे सागरी अर्थव्यवस्थेच्या आणि सागरी शाश्वततेच्या अफाट शक्यता आहेत. या आधारे हजारो स्टार्ट उभे राहून नवीन व्यवसाय संधी निर्माण होऊ शकतात. त्याचबरोबर, किनारपट्टीची स्वच्छता कशी राखता येईल, मरीन इकॉनॉमीमध्ये शाश्वतता कशी आणता येईल, या प्रत्येक गोष्टीसाठी नाविन्यपूर्ण विचार आणि उपायांची गरज असून स्टार्टअपसाठी ही एक मोठी संधी आहे. आज मरीन रोबोटिक्ससारख्या नवकल्पनांवर भर दिला जात आहे, जे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, आपल्या संस्था सॉलिड आणि लिक्विड वेस्ट मॅनेजमेंटमध्ये सतत नवे प्रयोग करत आहेत. समुद्र, नद्या किंवा नाले यामधील प्रदूषणाचा बहुतांश भाग हा औद्योगिक नसून, ९०% प्रदूषण सामान्य नागरिकांकडून तयार होणाऱ्या कचऱ्यामुळे होते. जर आपण शाश्वत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने या कचऱ्यावर योग्य उपचार करू शकलो, तर पूर्वीप्रमाणेच आपली जलस्रोत स्वच्छ ठेवणे शक्य होईल. म्हणूनच या संपूर्ण क्षेत्रात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि स्टार्ट-अप्सची अत्यंत गरज असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आज भारतातील स्टार्टअप इकोसिस्टम जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या इकोसिस्टमपैकी एक आहे. चीननंतर भारतात सर्वाधिक स्टार्टअप्स उदयाला आले असून, भविष्यात भारत जगातील सर्वात मोठी स्टार्टअप शक्ती बनेल, याची खात्री मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी व्यक्त केली. नवी मुंबईत 300 एकरमध्ये देशातील सर्वात आधुनिक ‘इनोव्हेशन सिटी’ उभारण्याचे काम सुरू आहे. येथे सायन्स, टेक्नोलॉजी, बायोटेक्नोलॉजी, डेटा सायन्स आणि ॲडव्हान्स मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील स्टार्टअप्सना इनक्यूबेट केले जाणार आहे. यासोबतच जागतिक दर्जाच्या १२ विद्यापीठांचे कॅंपसेस असलेली ‘एज्यु-सिटी’ देखील उभारली जाणार असून, त्यात १ लाख विद्यार्थी शिक्षण घेतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सर्क्युलर इकॉनॉमीचा विशेष उल्लेख करत सांगितले की, कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर स्टार्टअप्स उदयास येत आहेत. महाराष्ट्राला देशाच्या स्टार्टअप क्रांतीत अग्रणी बनवण्याचा आमचा संकल्प आहे. केंद्रीय आणि राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नातून आपण शिक्षण व इनोव्हेशन या क्षेत्रात नेतृत्व करणार असल्याचेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले. स्टार्टअप क्षेत्रात भारताची झेप – लहान शहरांमधून होत आहे मोठा उदय - केंद्रीय राज्यमंत्री डॉ.जितेंद्र सिंग केंद्रीय राज्यमंत्री डॉ.सिंग म्हणाले की, १२ ते १४ तास कंपनीत काम करूनही अपेक्षित उत्पन्न मिळत नाही, आणि काहीजण शिक्षणाविना अधिक कमावत आहेत – मग आपण का मागे राहावे?” अशा भावना मांडत भारत सरकारने स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी नवे मार्ग आखले आहेत. लहान शहरांमधून येणाऱ्या स्टार्टअप्सचा मोठा वाटा लक्षात घेता, सरकारच्या विविध योजनांचा फायदा सर्वांनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. गेल्या १० वर्षांत भारत ‘फ्रॅजाइल फाइव्ह’ देशांमधून बाहेर येत थेट ‘टॉप फाइव्ह’ अर्थव्यवस्थांमध्ये पोहोचला आहे. ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्समध्ये भारताने ८१व्या क्रमांकावरून थेट ३९व्या क्रमांकावर झेप घेतली आहे. देशभरात सुमारे २.५ लाख स्टार्टअप्स सक्रिय असून, यापैकी ४९% लहान शहरांमधून – जसे की सूरत, अहमदाबाद, अमृतसर, चंदीगड – उदयास आले असल्याचे केंद्रीय राज्यमंत्र्यांनी सांगितले. सध्या देशात ६४,४८० पेटंट्स फाइल झाले आहेत, ज्यापैकी ५६% पेटंट्स हे भारतातच शिक्षण घेतलेल्या, येथेच काम करणाऱ्या भारतीयांनी दाखल केले आहेत. ही बदलती मानसिकता आणि संधींचा विस्तार भारताला आत्मनिर्भर बनवत आहे. यासाठी सरकारने अनेक योजना सुरू केल्या आहेत. निधी योजना, नेशनल इनिशिएटिव्ह फॉर डेवलपमेंट अँड हार्नेसिंग इनोव्हेशन (NIDHI) अशा उपक्रमांतून आर्थिक, तांत्रिक व मार्गदर्शन सहाय्य दिले जात आहे. विशेष म्हणजे आता वयोवृद्ध व दिव्यांग नागरिकांसाठीही स्टार्टअप संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. जैव तंत्रज्ञान, समुद्र आधारित संसाधने (Marine Startups), कृषी तंत्रज्ञान (Agri-Tech) यांसारख्या नव्या क्षेत्रांतून पुढील २५ वर्षांत भारताच्या अर्थव्यवस्थेची वाढ अपेक्षित आहे. कृषी क्षेत्राचा GDP वरील वाटा सध्या ३०-४०% असून तो वाढविण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर गरजेचा आहे. यु वा पिढीने स्टार्टअप क्षेत्रात सक्रिय सहभाग घ्यावा, आणि ‘विकसित भारत 2047’ या स्वप्नपूर्तीसाठी आपली जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री डॉ.सिंग यांनीं केले. स्टार्टअप क्षेत्र ‘मास मूव्हमेंट’ बनावे, यासाठी धोरणाची तयारी सुरू - मंत्री मंगलप्रभात लोढा आज महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक स्टार्टअप्स आहेत. पण येणाऱ्या काळात ही चळवळ शहरातून गावाकडे पोहोचली पाहिजे. आणि स्टार्टअप ही केवळ तंत्रज्ञानापुरती मर्यादित न राहता, ग्रामीण भागातील समस्या सोडवणारी शक्ती बनली पाहिजे. त्याचबरोबर नवीन स्टार्टअप धोरण तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे धोरण केवळ शहरी भागापुरते मर्यादित न ठेवता, गावखेड्यांपर्यंत पोहोचवण्याचा शासनाचा प्रयत्न असेल. स्टार्टअप क्षेत्र ‘मास मूव्हमेंट’ बनावे, यासाठी हे धोरण तयार केले जात असून, त्यावर लोकांचे मत मागवले गेले असल्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा आपल्या भाषणात सांगितले. यावेळी एनआयओचे संचालक प्रा.सिंह एनसीएलचे संचालक डॉ.लेले, नीरीचे संचालक आणि डॉ.वेंकट मोहन यांचीही भाषणे झाली.

## // अत्यंत दुःखदायक संसारातून सुटण्याचा मार्ग संतांचे पाय धरणे आहे.// योगीराज महाराज गोसावी. पैठण

बीड प्रतिनिधी : संसार हा दुःख मूळ आहे त्यात कसलीच विश्रांती नाही.या बंधनातून सुटणे म्हणजे अत्यंत दुःख नाश होणे व परमानंदाची प्राप्ती करून घेणे आहे. यासाठी संतकृपा आवश्यक आहे. त्याने आत्मसुख प्राप्त होते. यात सर्व दुःख नाश व सुखाची प्राप्ती आहे.म्हणूनच अत्यंत दुःखनाश व संसारातून सुटण्याचा मार्ग संताचे पाय धरणे आहे असे प्रतिपादन हरिभक्तिपरायण योगीराज महाराज गोसावी श्री क्षेत्र पैठण श्री संत एकनाथ महाराजांचे वंशज यांनी शिरापूर धुमाळ येथे तिसरे किर्तन पुष्पगुंफताना केले आहे.

शिरूर तालुक्यातील मौजे शिरापूर धुमाळ येथे श्रीक्षेत्र नारायण गडाच्या अधिनस्त, वैकुंठवासी महादेव बाबा यांच्या प्रेरणेने, विद्यमान महंत हरिभक्ती परायण शिवाजी महाराजांच्या शुभ हस्ते व हरिभक्त परायण संभाजी महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात हरी प्राप्तीसी उपाय /धरावे संतांचे ते पाय//1// या एकनाथ महाराज यांच्या चार चरणी अभंगातून हरिभक्ति परायण योगीराज महाराज गोसावी हे साधकाला मार्गदर्शन करतात.


आपल्या अभंग निरूपणातून बोलताना योगीराज महाराज गोसावी म्हणाले की, संत हे सर्वांना सम पाहतात. नाथ महाराजांचे संस्थान हे श्रीमंत संस्थान आहे. नाथाना हरी प्राप्ती नाही तर हरीलाच एकनाथ महाराजांची प्राप्ती झाली आहे. भगवंताने नाथाच्या घरी छत्तीस वर्ष सेवा केली, विठ्ठल म्हणून कीर्तनात टाळ घेऊन उभा राहणे, घरी चंदन उगाळणे, कावडीने पाणी भरणे, अशी कामे केली. नाथांच्या घरी 21 फूट खोल रांजण आहे. देव नाथांच्या घरी सेवा करण्याकरताच आले होते. भगवंताची आपणास प्राप्ती करून घ्यायची आहे यासाठी आपणास संतांचे पाय धरावे लागतील. याने काय होईल तर भावनाम संसार संपेल. अत्यंत दुःखाचा नाश व परमानंदाची प्राप्ती होईल. म्हणजेच मोक्ष मिळेल. संतांचा सहवास केल्यास आपणासारखे करिती तात्काळ/ नाही काळ वेळ तया लागी/ संत हे आपले मनोरथ पूर्ण करून देतात. म्हणजेच सर्व दुःख नाश व सुखाची प्राप्ती करून देतात. असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी हरिभक्ति परायण लक्ष्मण महाराज तकीक, रामहरी रसाळ गुरुजी, व्यंकटेश कुलकर्णी, दादा बहिर, गोटू टेलर, कल्याण बहिर, बहिर सर, लहू म.बहिर, बप्पा बहिर, गायक म्हणून डोळस महाराज, अभिमान म.आहेर, सय्यद म.कटुमिया, बंडू म.कदम, शिवाजी महाराज मिसाळ, तर मृदंग मनी म्हणून विठ्ठल महाराज गलधर व असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

आपला विश्वासू,रामहरी रसाळ.



## जीवन मिसळ



जीवन ही एक छान मिसळ आहे.

ज्यात सुखाचे मोड आलेले आहेत. त्यात विविध मूड आणावे लागतात. असंख्य अनुभवाचे फरसाण अधिक असतं. ढीगभर आणि डिशभर दुःखाचा कांदा डोळ्यात पाणी मात्र आणतो.

स्नेह, प्रेम,आपुलकी यांची हिरवीगार कोथिंबीर मिसळीची शोभा छान वाढवते. जीवन मिसळीवर छान पेरली जाते. जीवनातील दुःखाला जरा ही कमी करते.

मतभेदांचे दही आणि लिंबू जिभेला मात्र चटका मारत जातं. तरीसुद्धा ते हवस असतं. कारण त्याशिवाय जीवनाला अर्थ राहत नाही. आंबट चिंबट अनुभवाशिवाय आपण पुढे जात नाही. आणि सर्वांनाच हे जीवनामध्ये आंबट चिंबट अनुभव आलेले असतात. नव्हे ते घ्यावेच लागतात.

जीवनातल्या स्वप्नांचे ठिसूळ पापडाने क्षणात तुकडे तुकडे होतात. काही क्षण गोळी सारखे विरघळूनही जातात.

मनोरथाच्या या रसामध्ये मनाचा पाव जितका बुडवता येईल तितका तो फुगत जातो. पण मनोरथ पूर्ण होत नाहीत.

शेवटी काय तर जीवाच्या मित्रांबरोबर अशा मिसळीची लज्जत घ्यायला खूप मजा येते. जेव्हा जिवाभावाच्या मित्रांबरोबर ही जीवन मिसळ शेअर करून खाल्ली तर निश्चितच आपल्या अशा वेळेला स्टीलचा चमचा देखील सोन्याचा होऊन जातो.

आणि जीवनाच्या मिसळ याला एक उत्तम स्वाद प्राप्त होतो. जीवन मिसळ चटपटीत होते. अशा प्रकारची ही जीवन मिसळ ज्यात मैत्रीचे सुखाचे मोड आलेले आहे ते निश्चित सर्वांनी सोन्याच्या चमच्याने खावेत. आपल्या जीवनाला बहार निश्चित येईल.


वसुधा नाईक, पुणे
मो. नं. 9823582118

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २१ मे २०२५
https://lokaarambh.com


## सीबीएसई 10वी मध्ये सचित्त चे घवघवित यश

(अजय गणविर) सचित्त मनोज मृणालिनी गणविर कल्याण (पुर्व), जिह्ला ठाणे येथे राहतो. कल्याण (पुर्व) येथील नांदिवली स्थित आर्य गुरूकुल शाळेमध्ये इंग्रजी माध्यमातुन शिक्षण घेत 95.60 टक्के अंक प्राप्त करून यश संपादित केले. पहिल्या पाच मध्ये चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल त्याच्या आई-वडीलांना खुप आनंद झाला. सचित्त रात्री अभ्यास करतांना स्वतः नोट्स तयार करून व मागील 10 वर्षाचे Previous year Questions (PYQ) मुळे त्याला अभ्यासात मदत झाली. याव्यतिरिक्त खेळामध्ये आवड असल्याने बास्केटबाल मध्ये सुद्धा जिह्ला स्तरीय स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगीरी बजाविली. तसेच संगीत व गिटार यामध्ये देखील त्याला आवड आहे. सचित्त ने यशा बद्दल सांगितले की यश संपादन करायचे असेल तर "परीक्षेपूर्वी अभ्यास न करता वर्षभर अभ्यास केल्यास उत्तीर्ण होण्यास मदत होते" "Rather than studying like a maniac before the day of examination like a tortoise every day throughout the year. Consistency, Discipline and Guidance. " या घवघवीत यशामागे सचित्त चे आई-वडील आणि आर्य गुरूकुल शाळेतील शिक्षकांना श्रेय दिले. भविष्यात Aeroautical Engineering करायचे ठरविले आहे. ह्या करीता त्याचे खुप-खुप अभिनंदन.





खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचं पुण्यातील राहत्या घरी निधन झालं आहे. ते 86 वर्षांचे होते. आंतररष्ट्रीय स्तरावर ज्यांचा खगोल शास्त्रातील अधिकार मान्य झाला होता असे जयंत नारळीकर तेवढ्याच रसाळ भाषेत मराठी विज्ञानकथा लिहण्यासाठी देखील लोकप्रिय होते. भावपूर्ण श्रद्धांजली

## पाटोदा तालुक्यातील टोकन बी बी एफ झालं पाहिजे :- कैलास पन्हाळकर

पाटोदा प्रतिनिधी:-वॉटर सेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट व ॲक्सिस बँक फाउंडेशन अर्थ सहित आज पाटोदा विभागातील प्रामुख्याने सोयाबीन करत असलेले पिट्टी उखंडा जवळाला, तळेपिंपळगाव, माळपाचीवाडी ,उंबरविरा, धोपटवाडी ,कुटेवाडी ,चिंचोली, कोतन ,गवळवाडी ,नागेशवाडी या गावातील महिला पुरुष शेतकरी यांचा शेतकरी अभ्यास सहल व प्रशिक्षण कार्यक्रम हिंगणी बुद्रुक तालुका जिह्ला बीड या ठिकाणी श्रीकांत कुलकर्णी यांच्या शेतात पार पडला. यावेळी सोयाबीन पिकातील एस. ओ पी याचे प्रात्यक्षिक डेमो देण्यात आले. त्याचबरोबर गटात काम करणाऱ्या शेतकऱ्याने गटाचे होणारे फायदे या विषयी माहिती दिली. गटाने खत बियाणे एकत्र खरेदी करण्यापासून ते इर्जीक च्या माध्यमातून शेतीवर होणारा खर्च कसा कमी करता येईल याची माहिती गटातील शेतकऱ्यांनी दिली. त्याचबरोबर टोकन यंत्राने पेरणी केल्यास बियाणे किती लागते आणि टोकन यंत्राने पेरणी कशी करायची याचेही प्रात्यक्षिक आज देण्यात आले. त्याचबरोबर बी बी एफ यंत्र पेरणीचे फायदे आणि नंतर कशा पद्धतीने पेरणी होते याची प्रात्यक्षिक आज शेतकऱ्यांना देण्यात आले. त्यानंतर शेडनेट पॉलिहाऊस यामधील सिमला मिरची याची माहिती देण्यात आली. त्याचबरोबर पॉलिहाऊस उभारणी करता आपणास पोखरा आणि इतर शासकीय योजनेचा कसा लाभ घ्यायचा याविषयी माहिती



शेतकरी श्रीकांत कुलकर्णी यांनी सांगितले. याचबरोबर या ठिकाणी पाणी फाउंडेशन च्या माध्यमातून इथेनॉल निर्मितीसाठी गोड ज्वारीचा प्रयोग चालू आहे त्याचाही प्लॉट शेतकऱ्यांना दाखवण्यात आला. जमिनीचा सेंद्रिय पोत सुधारण्यासाठी शेतकऱ्यांनी शेणखत, गांडूळखता सोबत डि कंपोस्ट करूनच शेणखत याचा प्रभावी वापर करावा आणि पिकाचे अवशेष जमिनीतच घाडावेत असा सल्लाही यावेळी श्रीकांत कुलकर्णी यांनी दिला. या वेळी यशोदीप शेतकरी गट बोरखेड, शंभूराजे शेतकरी गट पिंपळगाव घाट व श्रीहरी शेतकरी गट हिंगणी या गटातील प्रमुख शेतकरी, पाणी फाउंडेशन टीम बीड, वॉटर शेड टीम पाटोदा उपस्थित होती.आणी पिठी उखंडा ट्रॅक्टर ड्रायव्हर टीम पुनाजी मामा वादगे अशोकरावजी नेहराळे अर्जुन सोनसळे संकेत भैया लोखंडे प्रगतशील शेतकरी कल्पेश भोंडवे सचिन मुकादम भोंडवे सर्वांना अतिशय सुंदर मार्गदर्शन करण्यात आले मार्गदर्शक कैलास पन्हाळकर सर राजेंद्र जाधव सर वॉटर टीम पाटोदा इत्यादी उपस्थित होते

## उल्हास नदी बचाव समितीच्या आंदोलनाला यश,अनधिकृत भराव प्रकरणात दहा कोटीचा दंड

बदलापूर-उह्लास नदीमध्ये करण्यात आलेल्या अनधिकृत भराव,संरक्षण भिंतीचे बांधकाम व नदीपात्रातील अतिक्रमण प्रकरणी उह्लास नदी बचाव समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.हेंद्रेपाडा येथील सत्संग विहार समितीने नदीपात्रातात अनधिकृतपणे भराव टाकण्याचे आणि संरक्षक भिंतीचे काम सुरु केले होते.या अतिक्रमणाची माहिती मिळताच उह्लास नदी



बचाव समितीने महसूल,पोलिस आणि कुळगांव-बदलापूर नगरपरिषद प्रशासनासह संबधित अधिका-यांकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्वरीत कृती करत प्रशासनाने संबंधित काम थांबविले आणि आणि वापरात असलेल्या जेसीबी,पोकलेन मशिनरी सील केली होती.याप्रकरणी तहसीलदार मा.अमित पुरी यांनी ठोस कार्यवाही करत सत्संग विहार समितीवर १०कोटी १६लाख १७हजार १४१रुपयांचा दंड ठोठावला आहे.त्यांच्या या निर्णयाचे उह्लास नदी बचाव समितीने प्रशासनाचे मनःपूर्वक कौतुक करत मनस्वी आभार मानले आहेत.तसेच इलेक्ट्रॉनिक मिडीया,प्रिंट मिडीया,युट्युब चॅनल व सर्व पत्रकार बंधु-भगिनी यांनी महत्वपूर्ण सहकार्य केले त्याबद्दल त्यांचेही उह्लास नदी बचाव समितीच्या वतीने धन्यवाद व आभार व्यक्त करण्यात आले.

## अभंग लेखन स्पर्धेचे आयोजन- जीवन गौरव साहित्य परिवार

अभंग लेखन स्पर्धेचे आयोजन रविवारला जीवन गौरव साहित्य परिवार महाराष्ट्र राज्य तर्फे करण्यात आले. कवयित्री वनिता लिचडे यांच्या परीक्षणातून विजेते ठरविण्यात आले असून कवयित्रींच्या कविसंमेलनात ते घोषित करण्यात आले. यात प्रथम क्रमांक प्रा. रविंद्र गिमोणकर नागपूर, द्वितीय क्रमांक विधी बन्सोड कुरखेडा, माया मुत्यलवार यवतमाळ, तृतीय क्रमांक कल्पना देशमुख यवतमाळ, कविता शिरभाते यवतमाळ, वैशाली टिचकुले यवतमाळ आणि




उत्तेजनार्थ ज्योत्स्ना बन्सोड कुरखेडा यांनी पटकावला. समुहावर सर्व क्रमांकाचे घोषणा करुन प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कविसंमेलनाचे अध्यक्ष अश्विनी किशोर बारामती असून अतिथी वनिता लिचडे पवनी यांनी निकालाची घोषणा करुन कविता सादर केले. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन भारती शिवणकर गडचिरोली यांनी कविता सादरीकरणासह केले. कविता सादरीकरणात माया मुत्यलवार यवतमाळ(भ्रम), कल्पना देशमुख यवतमाळ(न लागो अहंकाराचा....), वैशाली लांजेवार बाळापूर त.( ते क्षण प्रितीचे) , कविता शिरभाते यवतमाळ(गझल) , संगीता नागदिवे यवतमाळ ( बालगीत-ससा) हे सहभागी झाले होते.

आभार संस्थापक गणेश कुंभारे यांनी मानले. प्रसंगी संयोजक रविंद्र गिमोणकर नागपूर, कार्याध्यक्ष उमेंद्र बिसेन पुणे, विनोद ढोरे शिक्षक आणि गीता गुह्लाणे उपस्थित होते. तंत्रस्नेही म्हणून नेहा कुंभारे यांनी काम पाहिले.

## जॉय सेवाभावी संस्थेची यशस्वी वाटचाल..



श्री. गणेश हिरवे सरांच्या पुढाकाराने जॉय या सेवाभावी संस्थेची स्थापना करुन त्यांनी व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून, एक चांगला समाजसेवेचा संदेश लोकांना दिला. याची दखल समाजहितैशी अशा समाजासाठी काहीतरी चांगलं करु इच्छिणाऱ्या व्यक्तींनी घेतली. उपक्रम शील असे कामाचे स्वरुप, सातत्य, त्यातील पारदर्शकता, निष्ठेने होत असलेले सेवाभावी कार्य यामुळे संस्थेचे काम अधिक विश्वासार्ह ठरले . आणि सुरुवातीला एक छोटेसे लावलेले झाड त्याचे मोठ्या वटवृक्षात रुपांतर कधी झाले हे गणेश सरांनाही समजलं नसावे. सहाजिकच मग गणेश सरांनीही मागे वळून पाहिलेच नाही. मुंबईसह महाराष्ट्रात इतर ठिकाणी कामाचे स्वरुप खूप कमी अवधित अधिकाधिक वृध्दिंगत होत गेले. आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणाऱ्यांचे हातही एकत्रित येऊ लागले.

खरे तर! आज जॉय या संस्थेचे सेवाभावी काम समाजातील सर्व स्तरावर सुरु आहे. पण गणेश सरांनी विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्यांना शिक्षण अधिक सुलभपणे घेता यावे यासाठी आदिवासी पाडे, आश्रम शाळा, अनाथालये, शाळा - विद्यालय येथील गरजू , गरीब आणि दुर्लक्षित विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन त्यांना लागणाऱ्या शालेय वस्तूंबरोबरच मूलभूत गरजेच्या वस्तूंचा नियमित पुरवठा करण्याचे व्रत अंगीकारले . त्यात सातत्य ठेवले. त्याचप्रमाणे समाजातील वंचित, दुर्लक्षित गरजू घटकांना मदत, ग्रामीण आदिवासी दुर्गम भागामध्ये प्रत्यक्ष जाऊन तेथील गरजवंतांना मदत आदी समाजाभिमुख अशा सातत्यपूर्ण कार्यामुळे, तेथील मानवसेवेमुळे जॉय या संस्थेचा कामांचा आलेख सतत चढताच राहिला. आणि तो इतर संस्थांना, युवकांना प्रेरणादायी व आदर्शवत ठरला. म्हणूनच या वर्धापनदिनाच्या निमित्ताने गणेश सरांसह जॉय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना आणि सदस्यांना व मदतीचा हात सातत्याने पुढे करणाऱ्या सर्वांनाच शुभेच्छा देताना मनस्वी आनंद होत आहे.

सुभाष हांडे देशमुख
मुख्य सचिव, युथ कौन्सिल नेरुळ, नवी मुंबई

## महागाव तालुक्यात वीज पडून शेतमजूर महिलेचा मृत्यू, एक महिला गंभीर जखमी; बैलही दगावला

महागाव प्रतिनिधी –महागाव तालुक्यातील पिंपळगाव (ई) शिवारातील शेतात वीज पडून एका शेतमजूर महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, दुसरी महिला गंभीर जखमी झाली आहे. तसेच या घटनेत एक बैल देखील जागीच दगावल्याची घटना सोमवारी (दि. १९ मे) दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास घडली.


सोमवारी महागाव तालुक्यात विजांचा कडकडाट व पावसाने हजेरी लावली. यावेळी पिंपळगाव येथील शिवारात काम करणाऱ्या महिलांवर आकाशातून वीज कोसळली. विमलबाई किसन भिसे (वय ३६) या शेतमजूर महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर उषा प्रल्हाद मेंढके या दुसऱ्या शेतमजूर महिला गंभीर जखमी झाल्या



असून, त्यांना तातडीने उपचारासाठी महागाव येथील रुग्णालयात हलवण्यात आले. या विजेच्या धक्क्यातून गावकऱ्यांनी बैलाचाही मृत्यू झाल्याची माहिती दिली असून, ही घटना टेळी (दिंगी) येथील शेतकरी जनार्दन राजू यांच्या शेतात घडली. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.या घटनेची माहिती पोलिस प्रशासन व महसूल प्रशासनाला देण्यात आली आहे. याप्रकरणी पंचनामा व आवश्यक कारवाई सुरू आहे.

# माजलगाव आगारात आणखीन ५ लाल पारी लवकरच दाखल होणार पापा सोळंके

माजलगाव परिवहन महामंडळ आगारासाठी विशेष बाब म्हणून नवीन आणखीन पाच लाल परी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन परिवहन मंत्री माननीय प्रतापजी सरनाईक साहेब यांनी शिवसेना शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके यांना दिले.. दि 19/5/2025 रोजी मंत्रालय मुंबई येथे भेटून सदरील निवेदनाद्वारे विनंती केली की बीड जिल्ह्यातील परिवहन महामंडळाचे माजलगाव आगार हे महामंडळाला सर्वाधिक उत्पन्न देणारे आगार आहे. मात्र या आगारामध्ये असलेल्या सर्वच्या सर्व बसेस जीर्ण अवस्थेत आहेत अशा बसेस आगारातून बाहेर पडल्यावर रस्त्यात सतत नादुरुस्त पडतात




त्यामुळे अपघात दुर्घटना घडण्याची शक्यता आहे




बसेसची अशी अवस्था असताना या आगारास मागील दहा ते बारा वर्षापासून नवीन बस देण्यात आलेल्या नाहीत माजलगाव हे सर्वाधिक उत्पन्न देणारे आगार असताना नवीन बसेस उपलब्ध नसल्याने लांब पल्ल्याच्या बसेस सोडल्या जात नाहीत . तरी परिवहन मंत्री माननीय प्रतापजी सरनाईक साहेब यांच्या माध्यमातून मागील आठवड्यामध्ये माजलगाव आगारात पाच बसेस दाखल झाल्या असून येत्या आठवड्यामध्ये आणखीन पाच बसेस माजलगाव आगारास देऊ असे आश्वासन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक साहेब यांनी शिवसेना शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके यांना दिले .यावेळी सोबत युवासेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २१ मे २०२५
https://lokaarambh.com



# भारतीय ट्रॅव्हल एजन्सींवर डोनाल्ड ट्रम्प यांची कारवाई; थेट व्हिसावर निर्बंध

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे सत्तेत आल्यापासून बेकायदेशीर स्थलांतराबद्दल सतत कठोर आणि मोठे निर्णय घेत आहेत. सोमवारी अमेरिकेनं भारतातील काही ट्रॅव्हल एजन्सींच्या मालकांवर, सीईओंवर आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांवर व्हिसा बंदीची घोषणा केली. या एजन्सींवर अमेरिकेत जाणूनबुजून बेकायदेशीर स्थलांतराला प्रोत्साहन दिल्याचा आरोप करण्यात आला. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने सोमवारी यासंदर्भात एक निवेदन जारी केलं. त्यात त्यांनी म्हटलं, ‘मिशन इंडियाचे कॉन्सुलर अफेअर्स अँड डिप्लोमॅटिक सिक्युरिटी आमच्या दूतावास आणि कॉन्सुलेटमध्ये दररोज बेकायदेशीर स्थलांतर आणि मानवी तस्करीमध्ये सहभागी असलेल्या लोकांची ओळख पटवून त्यांच्यावर कारवाई करत आहे.’ बेकायदेशीर इमिग्रेशन नेटवर्क तोडण्यासाठी भारतात कार्यरत असलेल्या ट्रॅव्हल एजन्सींच्या मालकांवर आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांवर परराष्ट्र मंत्रालयाकडून व्हिसा निर्बंध लादण्यात येत असल्याचंही निवेदनात पुढे म्हटलंय. अशा एजन्सींविरोधात अमेरिका कारवाई करत राहील, असंही मंत्रालयाने स्पष्ट केलंय.



“आमच्या इमिग्रेशन धोरणाचा उद्देश केवळ परदेशी नागरिकांना बेकायदेशीर इमिग्रेशनच्या धोक्यांबद्दल जागरूक करणं नाही तर आमच्या कायद्यांचं उल्लंघन करणाऱ्यांना जबाबदार धरणंदेखील आहे”, असं निवेदनात म्हटलं आहे. अमेरिकेचं हे व्हिसा निर्बंध धोरण जागतिक स्तरावर लागू असून व्हिसा वेव्हर प्रोग्रामसाठी पात्र असलेल्यांनाही लागू असल्याचं निवेदनात स्पष्ट केलंय. दरम्यान नवी दिल्लीतील अमेरिकन दूतावासातील एका अधिकाऱ्याला याविषयी विचारलं असता त्यांनी सविस्तर माहिती देता येणार नसल्याचं म्हटलंय. व्हिसा रेकॉर्डच्या गोपनीयतेमुळे आम्ही अशा व्यक्ती किंवा ट्रॅव्हल एजन्सींची यादी देऊ शकत नाही, ज्यांच्यावर अमेरिका व्हिसा निर्बंध लादण्यासाठी कारवाई करत आहे, असं ते पुढे म्हणाले. प्यू रिसर्च सेंटरच्या मते, 2024 पर्यंत अमेरिकेत अंदाजे 7,25,000 भारतीय स्थलांतरित होते. परराष्ट्र मंत्रालयाच्या मते, जानेवारी 2025 पासून 682 भारतीय नागरिकांना अमेरिकेतून हद्दपार करण्यात आलं आहे. त्यापैकी बहुतेकजण बेकायदेशीरपणे तिथं प्रवेश करण्याचा प्रयत्न करत होते. जानेवारीमध्ये पदभार स्वीकारल्यापासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक कठोर इमिग्रेशन धोरणं लागू केली आहेत.

## तणावामुळे होणारा हृदयविकार टाळण्यासाठी- डॉ.जगदीश टेकाळे

बीड : सध्याच्या धकाधकीच्या, गळेकापू स्पर्धेच्या आणि असुरक्षिततेच्या काळात ताणतणावाला अनेक लोक बळी पडत आहेत. तणाव हा मानसिक आरोग्याबरोबर शारीरिक आरोग्यावरही तितकाच दुष्परिणाम करत आहे. हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक, मधुमेह आणि उच्च कोलेस्ट्रॉलचे वाढते प्रमाण हा एक चिंतेचा विषय ठरला असून वेळीच उपचार यावर करण्याची आवश्यकता आहे. अशा समस्या टाळण्यासाठी काय करता येईल, याबाबत तज्ज्ञांनी माहिती दिली आहे.

हल्ली तरुणांना शिक्षण, नोकरी, सोशल मीडिया, आर्थिक अडचणी आणि वैयक्तिक अपेक्षांच्या ओझ्यामुळे उच्च पातळीच्या तणावाचा सामना करावा लागतोय. 20 ते 30 वयोगटातील तरुणांना हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक, रक्तातील साखरेची उच्च पातळी, मधुमेह आणि उच्च कोलेस्ट्रॉलसारख्या आजारांचे निदान होत आहे. तणाव हा एक सायलेंट किलर ठरतो आहे, जरी त्याची लक्षणे लगेच दिसून येत नसली तरी. त्यामुळे एखाद्याला जीवघेण्या धोक्याचा सामना करावा लागू शकतो. तणाव हे कॉर्टिसोलची पातळी वाढवते, जे एक तणाव संप्रेरक आहे व त्याचा समतोल बिघडल्यास ते रक्तदाब आणि साखरेची पातळी वाढवू शकतो तसेच पोटाभोवती चरबी साठवण्यास सुरुवात होते, ज्यामुळे लठ्ठपणाची समस्या उद्भवू शकते. जे हृदयरोग आणि मधुमेहासाठी जोखीम घटक ठरत आहेत. दुर्दैवाने तरुण वयोगटातील रुग्ण हे त्यांच्या आरोग्याकडे फारसे लक्ष देत नाहीत. तरुणांनी त्यांच्या आरोग्याची जबाबदारी घेणे आणि प्रतिबंधात्मक उपाय करणे ही काळाची गरज आहे. झोपेच्या कमतरतेमुळे तणाव वाढतो, रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते आणि लक्ष केंद्रित करण्यास अडचणी येतात. यासाठी एक वेळ निश्चित करून दररोज त्याच वेळी झोपायला जाण्याचा आणि उठण्याचा प्रयत्न करा, अगदी वीकेंडला सुद्धा त्याच वेळापत्रकाचे पालन करा. रात्री किमान 7 ते 8 तास शांत झोप घेणे आवश्यक आहे. विविध अभ्यासांनुसार, शारीरिक हालचाली, व्यायाम हे कॉर्टिसोलसारखे तणाव संप्रेरक कमी करण्यास मदत करतात आणि मेंदूतील तणाव कमी करणारे एंडोर्फिनसारखे संप्रेरकाचे प्रमाण वाढवतात. केवळ जिमला जाऊनच व्यायाम करावा असे काही नाही, तर चालणे, नृत्य करणे, सायकल चालवणे हे व्यायाम प्रकारदेखील जिमला जाण्याइतकेच प्रभावी ठरतील. जंक फूडचे सेवन टाळून आहारात फळे, भाज्या, तृणधान्य आणि कडधान्यांचे सेवन करा. शर्करायुक्त



पदार्थ आणि तळलेले पदार्थ ताण हे तुमच्या शरीराकरिता अहितकारक ठरतात. त्यामुळे तुम्हाला योग्य पोषण न मिळाल्यास थकवा जाणवू शकतो. जंक फूड, प्रक्रिया केलेले पदार्ख, तेलकट आणि हवाबंद डब्यातील पदार्थांचे सेवन टाळण्याचा प्रयत्न करा. दिवसातून फक्त 10 मिनिटे लांब श्वास घेणे किंवा श्वासोच्छवासाचा व्यायाम करणे हे तुमचे मन शांत करू शकते. योग आणि ध्यान हे आपल्या भावनांचे व्यवस्थापन करण्यास, लक्ष केंद्रित करण्यास आणि शरीराला आराम देण्यास मदत करतात. तणावमुक्त राहण्यासाठी बऱ्याचदा डिजिटल ब्रेक घेणे गरजेचे आहे. वाढत्या स्क्रिन टाईममुळे एखादी व्यक्ती चिंताग्रस्त होऊ शकते आणि झोपेच्या गुणवत्तेवर याचा परिणाम होऊ शकतो. डिजिटल डिटॉक्स हा पर्याय वापरून पाहा असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट) न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.9518551503, 9545615352

## विजेचा करंट लागून दोन गायी जागीच ठार – शेतकऱ्याचे मोठे नुकसान

गंगापुर, तालुक्यातील बोऱगाव (गट नं. १६८) येथील शेतकरी पोपट जयराम तांबे यांच्या दारात सकाळी दु:खद घटना घडली. विजेचा जोरदार करंट लागल्याने त्यांच्या दोन दुधाळ गायी जागीच ठार झाल्या. ही घटना मुसळधार पावसात घडल्याने गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पावसामुळे भिजलेली वीज लाइन किंवा तार पडल्यामुळे करंट पसरला असावा, अशी शंका आहे. या दुर्घटनेमुळे तांबे कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे, कारण या गायी त्यांचं प्रमुख उत्पन्नाचं साधन होत्या. शेतकऱ्याची व्यथा: घटनेनंतर व्यथित झालेल्या पोपट तांबे यांनी शासनाकडून तत्काळ नुकसान भरपाईची मागणी केली आहे. गायींची किंमत आणि दैनंदिन दुधाचे उत्पन्न लक्षात घेता, हा तोटा भरून निघणे अवघड आहे. गावकऱ्यांची मागणी: गावकऱ्यांनीही या प्रकाराकडे लक्ष देत महावितरणने तत्काळ पंचनामा करून मदत जाहीर करावी, अशी मागणी केली आहे. ही दुर्घटना विजेच्या सैल तारा आणि पावसाळी हंगामातील असुरक्षित वीज यंत्रणांची भीषणता अधोरेखित करते.

## वाशिमच्या पत्रकारितेतील मोठी पोकळी — नितीन पगार यांचे दु:खद निधन

वाशिम, ता. 20 दै.प्रजा-शासन प्रतिनिधी – वाशिम शहरातील ज्येष्ठ पत्रकार नितीन मुकुंदराव पगार (वय अंदाजे 50) यांचे आज पहाटे दुःखद निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून आजारी असलेल्या पगार यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. नितीन पगार हे वाशिम जिल्ह्यातील एक ओळखले जाणारे निर्भीड पत्रकार होते. विविध वृत्तपत्रांमधून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर लेखन केले. त्यांच्या ‘ऑपरेशन ड्रग्ज’ या नाटकासह अनेक नाट्यप्रयोगांना विशेष प्रसिद्धी मिळाली. पत्रकारिता, रंगभूमी, समाजकार्य व राजकीय क्षेत्रातही त्यांची सक्रिय उपस्थिती होती. त्यांच्या आकस्मिक निधनाने वाशिम जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पार्थिवावर आज दिनांक 20 मे रोजी सकाळी 10 वाजता वाशिम येथील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## कल्याणमध्ये इमारतीचा स्लॅब कोसळून मोठी दुर्घटना, ६ जणांचा मृत्यू

कल्याणमध्ये मोठी दुर्घटना घटना घडली आहे, इमारतीचा स्लॅब कोसळला, या घटनेत 6 जणांचा मृत्यू झाला आहे, तर काही जण ढिगाऱ्या खाली अडकल्याची माहिती समोर आली आहे. मृतांमध्ये तीन महिलांसह एका दीड वर्षांच्या चिमुकलीचा समावेश आहे. श्री सप्तश्रृंगी असं स्लॅब कोसळलेल्या या इमारतीचं नाव आहे. घटनेबाबत अधिक माहिती अशी की, कल्याणमधील श्री सप्तश्रृंगी इमारतीमध्ये स्लॅब कोसळल्याची घटना घडली आहे. या घटनेत चार जणांचा मृत्यू झाला आहे, तर काही जण ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. मृतांमध्ये तीन महिलांसह एका दीड वर्षांच्या चिमुकलीचा सावेश आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पालिका अधिकारी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. गेल्या तीन तासांपासून या ठिकाणी बचाव कार्य सुरू असून आतापर्यंत आठ जणांना ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आलं आहे. त्यातील चार जणांचा मृत्यू झाला असून, चार जणांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अजूनही काही लोक ढिगाराखाली अडकल्याची शक्यता



असल्यानं रेस्क्यू ऑपरेशन सुरुच आहे. बाहेर गेला आणि जीव वाचला, मित्र अडकला दरम्यान ही दुर्घटना जेव्हा घडली तेव्हा त्याच इमारतीमध्ये जितेंद्र गुप्ता आणि व्यंकट चव्हाण हे चौथ्या मजल्यावर कोबा करण्याचं काम करत होते. जितेंद्र हे दुपारी जेवण्यासाठी बाहेर गेले, याचदरम्यान हा स्लॅब कोसळला. जितेंद्र हे जेवणासाठी बाहेर गेल्यानं त्यांचा जीव वाचला आहे. मात्र त्यांचे मित्र व्यंकट हे मलब्याखाली अडकले आहेत. गेल्या दोन तासांपासून या ठिकाणी रेस्क्यू सुरू असून आतापर्यंत आठ जणांना बाहेर काढण्यात आलं आहे, त्यातील चार जणांचा मृत्यू झाला आहे, तर चार जणांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अजूनही तीन ते चार जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची माहिती समोर येत आहे. घटनास्थळी बचाव कार्य सुरू आहे. मलब्यात अडकलेल्या लोकांना बाहेर काढलं जात आहे. मृतांची नावं प्रमिला साहू 58 , नामस्वी शेलार 1.5, सुनीता साहू 37 , सुजाता पाडी 32, सुशीला गुजर 78, व्यंकट चव्हाण 42 जखमींची नावं अरुणा रोहिदास गिरणारायन 48, शरवील श्रीकांत शेलार 04, विनायक मनोज पाधी 4.5, यश क्षीरसागर 13, निखिल खरात 27, श्रद्धा साहू 14

## निष्क्रिय पालकमंत्री अजितदादांचा राजीनामा लोकशाही मार्गाने निदर्शने करत मागणा-या आंदोलनकर्त्यांना पोलिस प्रशासनाने उचलले ; अजितदादांची टगेगिरी सहन करणार नाही :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- )मी एकेकाला सुतासारखं सरळ करीन अशा वल्गना करणा-या पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या बीड जिल्ह्यात टोळक्यांनी मारहाण करत व्हिडिओ प्रसारित करून दहशत निर्माण केली असुन कायदा व सुव्यवस्था बिघडली असुन ती राखण्यास पोलिस प्रशासन असमर्थ ठरत आहे.पोलिस प्रशासनाचा धाक राहिलेला नाही आणि पालकमंत्री अजितदादा यांचे पोलिस खात्यावर नियंत्रण नाही नसल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यास असमर्थ, पवनचक्की कंपन्यांकडून महसूल व पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने दडपशाही व खोटे खंडणीचे गुन्हे दाखल असताना शेतकऱ्यांना न्याय देण्यास असमर्थ उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री महाराष्ट्र राज्य असुन तिजोरीच्या चाव्या हातात असताना बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना शासकीय मदत वेळेवर देण्यासाठी असमर्थ तसेच बीड शहरातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी महावितरणचे थकीत ३३ कोटी रुपये वीजबिल नियोजन अथवा वित्त विभागातुन देण्यास असमर्थ तसेच बीड जिल्ह्यातील जलजीवन योजनेंतर्गत कामांसाठी २५० कोटी निधीची आवश्यकता असताना केवळ १४ कोटी रुपये मंजूर करून ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यास असमर्थ बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी बीडच्या पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा यासाठी




सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, पांडुरंग हराळे, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, आसाराम माने यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने निदर्शने करत असताना त्यांना पोलिस प्रशासनाने आंदोलन करत असताना पकडून पोलिसांच्या गाडीत टाकून शिवाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये नेले आणि २ अडीच घंटे शिवाजीनगर पोलिस स्टेशनला बसवुन ठेऊन अजितदादा बीडमधून गेल्यानंतरच सोडून दिले. अजितदादांची टगेगिरी बीड जिल्हा सहन करणार नाही ; लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी :- डॉ.गणेश ढवळे आज दि.१९ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस अधीक्षक कार्यालय आणि शिवाजीनगर पोलिस स्टेशन यांना देऊन त्यांची आवक जावक घेतलेली आहे. तशा दैनिकात बातम्या १७,१८ तारखेला प्रसिद्ध झाल्या आहेत. आंदोलनकर्ते यांनी आक्षेपार्ह घोषणाबाजी केली नाही तसेच काळे झेंडे दाखवले नाही , अजितदादांची गाडी अडवली नाही. केवळ ५ आंदोलनकर्ते लोकशाही मार्गाने आंदोलन करत होते. माझ्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात येणार होते परंतु शुक्रवार पासुन ४ दिवस मी डॉ.आनिल बारकुल यांच्या दवाखान्यात आयसीयु मध्ये अडमिट आहे. मला दररोज रक्त चढवावे लागत असल्याने चक्कर येऊ शकते म्हणून आंदोलनास जाण्यासाठी परवानगी दिली नाही म्हणून मी आंदोलनात सहभागी नव्हतो. परंतु लोकशाही मार्गाने आंदोलन करणारांची पोलिस प्रशासनाकडून मुस्कटदाबी आणि अजितदादांची टगेगिरी बीड जिल्हा सहन करणार नाही अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे लिंबागणेकर यांनी दिली आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com